## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला ई ब्लॉक , सी २२, वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१

संकेतस्थळ:- www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल bocwwboardmaha@gmail.com

जा. क्र.मइवइबाकमं/आ. त./प्र.क्र.०७/यो-०२/3443/२०२३ दिनांक:- ०१ मार्च,२०२३

### कार्यादेश

प्रति,

**असोसिएट व्हाईस प्रेसिडेन्ट (मार्केटिंग)**
**मे.एच. एल. एल. लाईफकेअर लिमिटेड,**
**एल एल एल भवन पुजापुरा**
**तिरूअंनतपुरम, केरला**

विषय :- **मंडळातील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्याचा कार्यारंभ आदेश.**

संदर्भ :- १. उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.इबांका-२०१८/प्र.क्र१७/काम-७ दि.२१.१२.२०१९

२. या कार्यालयाचे कार्यादेश क्र.मइवइबाकमं/ आरोग्य तपासणी/ १७३/२०१९ दि.२४.१२.२०१९

३. मे.एचएलएल लाईफकेअर लिमिटेड यांचा दि.०७.०३.२०२२ रोजीचा प्रस्ताव

४. या कार्यालयाचे पत्र क्र.आरोग्य तपासणी योजना/२०२२/प्र.क्र.०७/ योजना-०२/१०६१ दि.१०.०५.२०२२

५. या कार्यालयाचे पत्र क्र. आरोग्य तपासणी योजना/२०२२/प्र.क्र.०७/ योजना-०२/११२८ दि.१८.०५.२०२२

६. उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.इबांका-२०१९/प्र.क्र१७/काम-७ दि.२९.०६.२०२२.

७. मंडळ व मे.एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यातील करारनामा दि.२६.०६.२०२२ व कार्यादेश क्र.१४७९ दि.२९.०६.२०२२

८. या कार्यालयाचे पत्र क्र. मइवइबाकमं/HLL प्रस्ताव/३२४७/योजना-०२ दि.१६.०२.२०२३.

९. उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.इबांका-२०१९/प्र.क्र१७/काम-७ दि.२७.०२.२०२३.

१०.उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.इबांका-२०१९/प्र.क्र१७/काम-७

दि.०१.०३.२०२३.

११.मंडळ व मे.एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यातील विषयाकित प्रकरणी करारनामा दि.०१.०३.२०२३.

महोदय,

मंडळातील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणीबाबत संदर्भ क्र. (०१) ते (०७) अन्वये वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. मंडळातील नोंदीत (सक्रिय) जिवीत बांधकाम कामगारांची व त्याच्या कुटुंबामधील (अवलंबितामधील) यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांच्या दोन अविवाहित १० वर्षावरील अपत्ये यांची मे.एच.एल.एल.लाईफकेअर प्रा.लि. या कंपनीमार्फत २३ चाचण्या प्रति व्यक्ती रु.३९००/- दराने करण्याबाबत शासनाच्या संदर्भ क्र. (०९) व (१०) अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.त्यानुसार संदर्भ क्र. (११) अन्वये मंडळ व मे.एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यामध्ये सदर प्रकरणी दि.०१.०३.२०२३ करारनामा करण्यात आला आहे. त्यानुसार खालील तक्त्यात नमूद आरोग्य तपासणी चाचण्या व त्यांचेसमोर नमूद प्रति चाचणी दर यानुसार खालील नमूद अटी शर्तीना अधिन राहून कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत :-

| Sr.No. | Particulars | Approved rate (Rs.) |
|---|---|---|
| 1. | Doctor consultation – detailed Physical Examination | 255 |
| 2. | Lung function test* | 210 |
| 3. | Audio screening Test (Pure Tone Audiogram) | 200 |
| 4. | Vision Screening Test | 81 |
| 5. | CBC test | 102 |
| 6. | Blood sugar -Random | 21 |
| 7. | Liver Function Tests | 234 |
| 8. | Renal (Kidney) function tests | 222 |
| 9. | Lipid Profile | 182 |
| 10. | Malaria Parasite | 36 |
| 11. | ESR | 30 |
| 12. | T3 T4 TSH | 213 |
| 13. | Serum Iron | 100 |
| 14. | GGTP | 100 |
| 15. | Magnesium | 154 |
| 16. | Rheumatoid Factor (RA) | 89 |
| 17. | Vitamin B-12 | 218 |
| 18. | Vitamin D-3 assay | 550 |
| 19. | Carcinoembryonic Antigen (CEA) | 306 |
| 20. | Anti-Hepatitis C | 340 |
| 21. | VDRL | 42 |
| 22. | Hepatitis B Antigen | 102 |
| 23. | HIV | 150 |
| Gross Total | | 3937 |
| Deduction | | 37 |
| **Rate Per Construction worker (Exclusive of Taxes)** | | **3900** |
| (In words- Rs. Three Thousand Nine Hundred Only) | | |

३. कार्यादेशाच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे -

i) मंडळ व मे.एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड यांच्यामध्ये सदर प्रकरणी दि.०१.०३.२०२३ अन्वये करण्यात आलेल्या करारनाम्यातील सर्व अटी शर्ती सदर कार्यादेशास लागू राहतील.

ii) सदर आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजनाकरिता बांधकामाच्या ठिकाणाची निवड करून जिल्हा कार्यालयाची मान्यता प्राप्त करण्यात यावी.मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) सर्व बांधकाम कामगारांची व त्यांच्या कुटुंबामधील (अवलंबितामधील) यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची दोन अविवाहित १० वर्षावरील अपत्ये यांची आरोग्य तपासणी करावी. संबधित व्यक्तींची (बांधकाम कामगार व कुटुंब) एक वेळ आरोग्य तपासणी करावयाची असून, आरोग्य तपासणी करताना व्यक्तीची दुरूक्ती होणार नाही याची विभागीय कार्यालय व जिल्हा कार्यालय यांनी दक्षता घ्यावी.

iii) मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) सर्व बांधकाम कामगारांची व त्यांच्या कुटुंबामधील (अवलंबितामधील) यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची दोन अविवाहित १० वर्षावरील अपत्ये यांची आरोग्य तपासणीची मुदत दि.२७.०६.२०२७ अखेर राहील.

iv) मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबामधील (अवलंबितामधील) यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची दोन अविवाहित १० वर्षावरील अपत्ये आरोग्य तपासणीचे दर उपरोक्त तक्त्यात नमूदप्रमाणे प्रति व्यक्ती रू.३९००/- असे राहील.

v) बांधकाम कामगारांच्या घरी जाऊन आरोग्य तपासणी करताना डॉक्टर (वैद्यकीय अधिकारी) ऑनलाईन उपलब्ध असतील व त्यांच्या सेवा बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांना उपलब्ध केल्या जातील. तपासणीनंतर वैद्यकीय तपासणी अहवाल घेताना उपलब्ध तंत्रज्ञामार्फत काही अधिकची विचारणा संबंधित कामगारांना करावयाची झाल्यास तंत्रज्ञाच्या जवळील मोबाईल ॲपद्वारे ऑनलाईन आरोग्य सल्ला डॉक्टरांनी (वैद्यकीय अधिकाऱ्यांनी) दयावा.

vi) बांधकामाच्या ठिकाणावरील अनोंदीत बांधकाम कामगारांना नोंदीत करणेबाबत समन्वय साधणे.

vii) आरोग्य तपासणीकरीता बांधकामाच्या ठिकाणी किंवा बांधकामाच्या जवळच्या ठिकाणी किंवा बांधकाम कामगार संख्या कमी असल्यास संस्थेच्या HINDLAB मध्ये आरोग्य तपासणी करून कॅम्पचे आयोजन करणे.

viii) आरोग्य तपासणीच्या कॅम्पकरीता आवश्यक डॉक्टर, पॅरामेडिकल स्टाफ व हेल्थ वर्कर्सची टीम उपलब्ध करून देणे.

ix) आरोग्य तपासणी अंती तपासणीचे अहवाल बांधकाम कामगार, जिल्हा कार्यालय व मंडळ कार्यालयास विहीत कालावधीत उपलब्ध करून देणे.

x) आरोग्य तपासणी दरम्यान आजारी असलेल्या बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेतर्गत नियुक्त आरोग्य मित्र यांचेमार्फत पुढील उपचाराकरीता

रुग्णालयात दाखल करणे व उपचाराबाबत समन्वय साधणे.

xi) मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्याकरीता मंडळाने नव्याने प्रस्तावित केलेल्या चाचण्यांचे दर हे Central Government Health scheme (CGHS) च्या दरापेक्षा अधिक राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

xii) संबंधित जिल्हयातील नोंदीत बांधकाम कामगाराच्या आरोग्य तपासणीचे देयक आवश्यक अहवाल ,प्रमाणपत्रे इ.कागदपत्रांसह परिपुर्ण स्थितीत विहीत नमुन्यात जिल्हा कार्यालयात सादर करणे.

xiii) केंद्र व राज्य शासनामार्फत वेळोवेळी जारी करण्यात येत असलेल्या आरोग्य विषयक निर्देशाचे पालन करुन आरोग्य तपासणी कामकाज करणे.

xiv) सदर कार्यादेशाची अंमलबजावणी सदरचा कार्यादेश निर्गमित केलेल्या दिनांक ०१ मार्च,२०२३ पासून करण्यात यावी.

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

**प्रत :-**

१. मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्रधान सचिव, (कामगार), उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
४. अप्पर कामगार आयुक्त मुंबई कोकण विभाग/ पुणे/ नागपूर यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.
५. कामगार उप आयुक्त, मुंबई शहर/मुंबई उपनगर (पुर्व)/ मुंबई उपनगर (पश्चिम)
६. नाशिक/ औरंगाबाद/ पालघर/ रायगड यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.
७. सहाय्यक कामगार आयुक्त/ सरकारी कामगार अधिकारी (सर्व जिल्हा कार्यालये) यांना उचित कार्यवाहीस्तव सादर.